तासगाव : येथील संस्थामाता शिक्षणशास्त्र महाविद्यालय शैक्षणिक माता पुरस्कार देण्याचे जाहीर महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या देण्यात येते. समाजासाठी कार्य समाजाला ऊर्जा देणाऱ्या मातेला सुशीलादेवी साळुंखे महिला वर्ष २०२२-२०२३ पासून आदर्श करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणार्थींनीच्या मातेस हा पुरस्कार करण्याचा तसेच आपल्या कर्तव्यातून पुरस्कार दिला जाणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील हे अध्यक्ष असलेल्या पुरस्कार समितीचे गठन करण्यात आले होते. त्या पुरस्कार निवड समितीने आटपाडी येथील सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांची संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आदर्श माता प्रथम पुरस्कारासाठी एकमताने निवड केलेली आहे. सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांनी तासगाव आवले उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांनी आपल्या मुलांचाही उच्च शिक्षण दिलेले आहे. त्यांच्या दोन्ही मुली उच्चशिक्षित आहेत. सौ. तेजश्री पवार व सौ. प्राजक्ता घोडके यांनी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव येथे बी. एड. चे प्रशिक्षण घेतलेले आहे व दोन्हीही शिक्षिका आहेत. त्यांची मुलगी सौ. प्राजक्ता अजित घोडके यांचा शिवाजी विद्यापीठाच्या बी एड. परीक्षेत नवावा क्रमांक आलेला आहे. त्यांनी महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातलेली आहे. पुरस्काराचे स्वरूप मानचिन्ह व सन्मानपत्र

पान नं. २ वर

उष:कालाची वेळ आली, साहेबांची भेट झाली.

प्रा. जी. के. पाटील, तासगांव

बापूजी बंधुराजाला शोध
माझ्याही जवीन वेळी उपकार
तुमच्या डोळ्यांत मूर्तीत
डायरी आमच्या मूर्तीत
बालेला हायरी येता दीपा
मुक,ठ्याका कधी झाला झाला
ठेंडाळली ओली नयने आणा
हेंही बरं डे... रहाणका

प्रतिकूलतेचा सूर्य अतुष्यभर मजलेवाट करणाऱ्या वादात खेचालेल्या सुवेदार ज्ञानदीपाच साळुंखे घराण्यात जन्मालेल्या बापूजींनी मार तसून जेवताना संघर्ष पाचवली करा म्हणून दुडवा आणि उत्तरार्ध छाताडावरती कसा मिळाला. हे मिळालेला प्रत्येक संघर्षातून सिद्ध केले. विद्यासत्र करताना इस्लामपूरला शिक्षणप्रसार,साहुरवा इतिहास लेखक राजगुरु, तर १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात प्रतिसरकारच भूमिगत स्वातंत्र्य सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळात सह्याद्रीच्या वाऱ्याला साद घालणारा ज्ञानप्रसार. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक ४०० सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून अज्ञानाला फोडण्याचे सामर्थ्य देशाच्या ज्ञानाला स्वीकारण्यासाठी, उपेक्षितांचे अंतरंग बदलण्यासाठी गुरुदेव कार्यकर्त्यांची जत्री सभा करावा ज्ञानमूर्ती ८ ऑगस्ट १९८७ ला आपल्या हाती त्यांच्यात ताकदीचा सामर्थ्याशी वाणाचाच, त्यामाच्या घाटेने घालणारा, पूर्व संस्थेचे नेतृत्व म्हणून स्वीकारा असा कल्याणाणाऱ्याचा संदेश देऊन ईश्वराच्या सर्वेश साद घालीत, परमेश्वराशी लीन झाले लीनतेचा कळस अभयकुमारांच्या रूपातून आपल्याला पुनश्चोत्सव नव्या वाटा शोधण्यासाठी देऊन गेले.

साहेबांचा १९८० ला प्राध्यापक म्हणून संस्थेत झालेल्या प्रवेश, मराठी अध्यापन करतानाच मिळालेली विद्यार्थीप्रियता आणि प्राचार्य म्हणून तुळजापूर, तासगावचे येथे उत्कृष्ट काम करताना, जतला सायन्स कॉलेज सुरू करताना मिळालेला लोकप्रतिनिधी आणि लोकमान्य बापूजींच्या रूपात जपताना त्यांना मिळालेले यश, मिळालेली संस्थाचिव ते अध्यक्ष, कार्याध्यक्ष असा विविध पदांची संधी त्यातून त्यांचे उदयास आलेले नेतृत्व म्हणजे संस्थेचे रूपांतर आनंदवनात करणारे कर्तृत्व.

साहेब १९८५ ला संस्थेचे सचिव झाले.त्यांच्या एका सहीने माझ्या आयुष्यात विवेकानंद सारखाची जन्मोत्सवाच्या जयाची जोडले गेले. त्यांच्या वडीलांचे बापूजींचे सामर्थ्य, बापूजींच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आयुष्यभर अंगीकारलेले त्यागाचे तत्व मला, संस्थेतल्या गुरुदेव कार्यकर्त्यांना आयुष्यभर उपारी देवाने ठरले. एका महाराष्ट्रातील मोठ्या संस्थेचा मोठेपणा प्राप्त झालेला, मोठेपणा जपण्यासाठी बापूजींच्या विचारांची कजबा करण्यासाठी आयुष्य खर्ची करणारा हा ज्ञानदीपी माझ्या जीवनाचा शिल्पकार ठरला. प्रेम किती द्यावे आणि प्रेम किती घेत आहे हे आम्हा दोघांच्या मिलाने झाले. इतके प्रेम त्यांनी आम्हास दिले. कोकणी कसलाच अनुष्ठान अहवाल संस्थेसाठी एकही संधी त्यांनी दिली नाही. योग्य वेळी मला हवी ती बदली दिली माझ्या लेखणी, वाणीला सामर्थ्य दिले माझ्या संस्था भगिनीच्या आशीर्वादाने संस्थापकाच होताना डुबत होतो.

साहेबांच्या कडे कोणताही गुरुदेव कार्यकर्ता आला की, तो का आला आहे, त्याच्या येण्यात स्वार्थ आहे की त्याच्या सल्लेच्या थांबविण्या थेरा पाहून ते ओळखत, निर्णय घेत. एवढी मोठी संस्था चालवताना जनसामान्य प्रसंग अडचणीही अनेकांनी सांगेलाही उपदेश दिला. स्वार्थासाठी निष्कळ बदनामीचे तर पायरले पण त्यांच्या आयुष्याचा मन इतका शुद्ध होता की, अमुक नावाची दैवमय्यस्तातून वेगळी वर्तमानीच परिवर्तने त्यांच्या निर्णयात बदीच दिसली नाहीत. आज संस्था प्रशासनाला वर्षी ४० वर्ष आलेले स्वीर्ण,सकाळ आणि तरुण दरबारात मिळालेली सन्मानाचे आणि गुणांचेच सातत्यातील संस्कृतिक मिळाले आपल्या संस्थेचा ही साहेबांच्या कुशल नेतृत्वाची प्रतीतीच होय. अशा एका कर्तृत्वाची, गुरु संचालक, बापूजींच्या विचारांचा सरदारास आम्हा तीन सर्वांच्या वयाधिकीस वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना माझ्या लेखणी कंठातून शब्द उमटतात.

देव मानवातला माणूस
घेई जुन्याच्या कानोक
आनंदाचा फुलतील...
वैभवाने आम्हा टीलपील
हाके बापूजींचा आनंदाचा
वाढदिवसाला देतो आम्ही दुआ पेढा.

ज्ञानतपस्वी प्राचार्य अभयकुमार साळुंखे



प्रा. डॉ. ए. टी. पाटील

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक संस्थापक दानपूज्य शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील गोरगरीब कष्टकरी सामान्य जनतेच्या हितासाठी शिक्षण संस्थेची उभारणी केली. शिक्षणाचे पवित्र कार्य करत असताना अतिरेक कष्टपूर्वक आणि उच्च ध्येयाने प्रेरित होऊन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना बापूजींनी केली. भारतातील शिक्षण संस्थांचा अभ्यास केल्यानंतर आपलाच असे दिसून येते की, भारतामध्ये अनेक शिक्षण तज्ञांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा गौरव पूर्ण उल्लेख केलेला आहे. त्या पाठीमागे बापूजींचे वैज्ञानिक विचार, प्रामाणिकपणे कार्य करण्याची कमालीची उच्च नीतिमत्ता, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था म्हणजेच माझी कुटुंब आणि त्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने शिक्षण घेऊन देशाचा आदर्श नागरिक बनावे ही भावना शिक्षण महर्षी बापूजी यांच्याकडे होती.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कार्याचा आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उत्सवाचा भाग म्हणजे स्वामी विवेकानंद यांची जयंती. ही जयंती विवेकानंद जयंती सप्ताह म्हणून संस्थेमध्ये साजरी केली जाते. याच कालखंडामध्ये १७ जानेवारी ही तारीख संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब यांचा वाढदिवस म्हणून गुरुदेव कार्यकर्ते साजरा करण्याचे निश्चित करतात. परंतु साहेबांना ते कधीही रितसेसे रुचत नाही. संस्थेत १७ जानेवारी हा दिवस ज्ञानसिद्धीदा म्हणून साजरा केला जातो. या अंतर्गत विविध उपक्रम प्रत्येक शाखेवर राबवले जातात. ७५ वर्ष साहेबांना पूर्ण झाल्यानंतर साहेबांनी गुरुदेव कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव अमृत महोत्सवी वाढदिवस साजरा केला. त्यामध्ये साहेबांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू माझ्यासारख्या गुरुदेव कार्यकर्त्यांना पाहायला मिळाले. कविवर्य गोविंदाग्रजांच्या शब्दांमध्ये सांगायचे तर, 'राकट देशा, कणखर देशा,दगडाच्या देशा, नाजुक देशा, कोमल देशा फुलांच्याही देशा' असा हा छत्रपती शिवाजी महाराजांचा, संतांचे इतिहासात गाजलेला, आणि संत तुकाराम महाराजांच्या भाषेत माल तर 'देऊ कासेची लंगोटी नाठाळाच्या माथी मारू काठी' असा महाराष्ट्र आणि त्यामधील आमचे संगळे व्यक्तिमत्व म्हणजे आमचे साहेब.

एखाद्या सुसंस्कृत कुटुंबकर्त्याच्या पोटी जन्माला येणे हे जसे त्या व्यक्तीचे भाग्य असते तसेच कुटुंबकर्त्याने केलेले कार्य टिकवून ठेवणे हे सुद्धा त्याचे कर्तव्य असते. हे जतन प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वाटचालीमध्ये शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी उभारलेल्या वटवृक्षाला कायमस्वरूपी विस्तारण्यासाठी त्यांची गुडे जमिनीत घट्ट टिकवून ठेवण्यासाठी जे काही सोसावे लागते ते शांत आणि संयमी अंतःकरणाने सोसले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची प्रगती आहे त्यामध्ये सत्य, शील प्रामाणिकता त्याग निष्कलुषित आचार, मानवाचे अधिष्ठान इतरांचे दर्शन, हे शब्द अतिशय प्रामाणिकपणे आणि त्याग पूर्ण भावनेने जगलेले व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब. कुटुंबातून मिळालेले संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे आणि बापूजी साळुंखे यांचे संस्कार सगळी कार्यात विसरले नाहीत. त्यामुळेच संस्थेचे शताब्दी महोत्सव वर्ष साजरे होऊ शकले. साहेब जेव्हा जेव्हा शाळेला भेट देतात त्या त्यावेळी प्रत्येक गुरुदेव कार्यकर्ते आणि सेवक वर्ग सुरुवातीला साहेब येणाऱ्यापूर्वी बोलावा दडपणात असतो पण जेव्हा साहेब समोर येतात आणि शाळेची माहिती घ्यायला लागतात त्यावेळी आपल्या घरातीलच उदंड व्यक्ती बोलत आहे असे वाटायला लागते आणि कार्याध्यक्ष असलेल्या साहेबांच्या पुढेही सर्व गुरुदेव कार्यकर्ते शाळेच्या विस्तारासाठी विद्यार्थ्यांसाठी, प्रामाणिकपणे आपल्या भावना व्यक्त करतात. माझ्या महाविद्यालयामध्ये उपयोजनेला साहेब दोन-तीन वेळा आले आणि

पान नं. २ वर

Third Newsletter published on17th January 2023

स्नेहकुंज वार्तापत्र

| संपादक : डॉ. बी. एम. पाटील | कार्यकारी संपादक : डॉ. एम. एस. उभाळे | अंक – ४ था | वर्ष – ३ रे | २२ ऑक्टोबर २०२३

संपादकीय

प्र. प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हे व्रत घेवून शिक्षण सप्तर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्ञान गंगा घरोघरी पोहचविण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना सन १९५४ साली केली. संस्थेच्या शिक्षणशास्त्र विभागातील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव हे संस्थारुपेच विकसित होत आहे. सन २०१९ पासून महाविद्यालयातील भूमिपूत सुविधा निर्माण करण्यासाठी सतत धडपड चालू आहे. या धडपडीला मुख्य प्रेरणा मा. कार्याध्यक्षस्थ प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची आहे.

महाविद्यालयात भौतिक सुविधा, सांस्कृतिक बदल, तांत्रिक गुणवत्ता, सामाजिक उपक्रम, वैचारिकात्मक उपक्रम, पर्यावरणीय उपक्रम, वीस महोत्सव, विविध विषयांची मंडळे, माजी विद्यार्थी संघ यांचेतर्फे कार्यक्रम अशा विविध अंगाने महाविद्यालय विकसित होत असल्याची प्रक्रिया चालू आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सन २०२१ – २२ च्या माहेर वार्षिक अंकास ८ पारितोषिके प्रतिष्ठानच्यांनी मिळविलेली आहेत. महाविद्यालय स्थापने पासून युवा महोत्सवसाठ बक्षिस मिळालेले नाहते मात्र या तांत्रिक वर्षात कु. आफिन नदाफ हीने यश संपादन केलेले आहे. अशा विविध कार्यक्रमात महाविद्यालय आपली गुणवत्ता सिध्द करत आहे याचे आनंद सर्वांना वाटूक आहे.

महाविद्यालयात विविध उपक्रम घेतले जातात. विविध सहकालेय कार्यक्रमाचा वेळोवेळी घेतले जातात. याबाबतची माहिती फलक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांना असते. चालत्या वागणारी माहिती सर्वांनाच मिळण्यासाठी एखादे व्यासपीठ असावे असे सतत वाटत होते. महाविद्यालयातील वर्षभरात घेतले जाणारे उपक्रम, प्रकल्प, सहकालेय व अभ्यासेतर कार्यक्रम यांच्या प्रसिध्दी मिळविण्यासाठी स्नेहकुंज कॉलेज वार्तापत्रक तैमासिक वर्षातून दोनवेळा प्रकाशित करत आहोत. सध्याचा ४ अंक महाविद्यालय प्रकाशित करताना आनंद होत आहे. महाविद्यालयाचे पहिल्या फेरीतील नॅक मूल्यांकनातील मानांकन (बी +++) अशी ग्रेड मिळाली होती. दुसऱ्या फेरीतील नॅक मूल्यांकन बी ग्रेड (२.४४) प्राप्त झाली होती. महाविद्यालय तिसऱ्या फेरी सबंधे अ मानांकन मिळविण्यासाठी सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय सेवक आपले प्रतिज्ञापत्रीची संकलनातील आहेत.

नॅक मूल्यांकनाला सामोरे जात असताना महाविद्यालयातील मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पाटील बी. एम. सतत प्रयत्नशील असतात. यामध्ये स्टोअर सिस्टिम, कर्जा ऑडीट, ग्रीन ऑडीट, वॉटर रेन हारवेस्टिंग प्रकल्प, वर्मी कंपोस्ट खत प्रकल्प, वेस्ट वॉटर प्रकल्प, घन कचरा व्यवस्थापन, ई-कचरा व्यवस्थापन असे विविध प्रकल्प पूर्ण केले आहेत. तसेच अनेक महाविद्यालये, सामाजिक संस्था, एनजीओ, यांच्या बरोबर एमओयु करार केलेले आहेत. हे सर्व कार्य करताना संस्थेतील सर्व पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षणप्रेमी व्यक्ति यांच्या सहकार्यातून सर्व होत आहे.

महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींनी विविध कौशल्यात पारंगत होण्यासाठी महाविद्यालयात, अद्ययावत संगणक कक्ष, वाचन कक्ष व सेमिनार हॉल, विद्यार्थीनी कक्ष, स्वच्छता गृह, कलाभवन, इत्यादी सुधारणा महाविद्यालयात केलेल्या आहेत. महाविद्यालयातील दैनंदिन प्रार्थना घेण्यासाठी खुले प्रशस्त क्रीडांगण तयार केले आहे. क्रीडांगणावर प्रसन्नता वाटण्यासाठी विविध वनस्पतींच्या कुंड्या तयार केल्या आहेत. महाविद्यालयाचे वातावरण प्रसन्न करण्यासाठी सतत प्रयत्नशील सेवक वर्ग असतात.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभ गुणधीर पवार यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक सेवा शिरून हवेली यांचा विशेष गौरव पुरस्कार, उपप्राचार्यांना शाळा व मुख्याध्यापक – शिक्षक सिक्केतर गौरवशाली पुरस्कार प्राप्त झाल्याने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नावलौकिकात भर पडली आहे. याची नोंद सादर अंकात घेतलेली आहे.

महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे शालेय व्यवस्थापन पदविका, एम. ए. (शिक्षणशास्त्र) तसेच योगा प्रशिक्षण व बेसिक टेलरिंग कोर्स चालू केलेले आहेत. या कोर्सना विद्यार्थी प्रतिसाद चांगला आहे. या विविध कोर्स मुळे समाजातील वंचित घटकाना या कोर्सचा फायदा होत आहे.

वरील सर्व महाविद्यालयाचा मलोचा प्रेता महाविद्यालयातील सर्व बदल हळुहळु होत असताना आम्हा सर्वांना आनंद होत आहेच. मात्र हा आनंद सर्वांना सांगण्यासाठी एक व्यासपीठ हवे होते यासाठी स्नेहकुंज कॉलेज वार्तापत्रक संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आम्ही सर्वजण आनंदाने प्रकाशित करत आहोत. वाचक तो स्थिकारतील याची खात्री आहे. या अंकामध्ये प्रा. डॉ. ए. टी. पाटील यांचा साहेबांवरील लेख, प्रा. डॉ. एम. एस. उभाळे यांचा सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थीनींचा व्यक्तीमत्व विकास, प्रा. डॉ. एल. व्ही. भंडारे यांचा स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार, प्रा. ए आर पंडीत यांचा भरड धान्यावरील लेख, विद्यार्थिनी कु. स्वामी गुंजवटे हिचा वक्तृत्व स्पर्धेतील लेख आणि महाविद्यालयातील उपक्रमाच्या बातम्या असे सविस्तर लिखाण आहे. वाचकाना यावेळीही ते नक्कीच आवडेल.

महाविद्यालयाची नवीन इमारत

प्राचार्य अभयकुमार साळुंखे

कार्याध्यक्ष स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर

– प्रा. डॉ. ए. टी. पाटील,

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांनी अनेक अभंग लिहिले त्यामधील एक सुप्रसिद्ध अभंग,

पुत्र व्हावा ऐसा तुझा। उभयां निम्ही लोकी प्रेमा ।
कन्या ऐसी देई। जैसी त्रिजा भूमाबाई ।।

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक, संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी जी ज्ञानगंगा अगदीर अगवांच्या विचाराने खेडापाडाच्यामध्ये नेण्याचे कार्य केले त्याच्यातून बापूजींची शिक्षणगंगा हीच तिन्ही लोकांमध्ये फाकवण्याचे कार्य केले. संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे या नावाप्रमाणेच बापूजींची आणि स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची आजन्म सावली बनून राहिल्या मीरा आणि मुक्ताबाईचे त्यागाचे कार्य जर पाहिले असेल तर ते संस्थामातेच्या जीवनातून दिसून येते. त्या कर्वाच्या, सुसंस्कारात वाढत्या प्रभावी अभयकुमार साळुंखे. आज मी या लेखामध्ये आदरणीय प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मातृऋण किंवा ज्ञानाचे सुसंस्कार कार्य असलात हे सिद्ध करण्यासाठी जे कर्तृत्व उभे केले त्याबद्दल येथे लिहिणार आहे.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर या संस्थेच्या महाराष्ट्रामध्ये अनेक ज्ञानशाखा आहेत त्यापैकीच एक म्हणजे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव. मुलींच्या शिक्षणाचे आणि सबलीकरणाचे एक सुसंस्कार केंद्र म्हणून या शाखेकडे पाहिले जाते. या महाविद्यालयाने अनेक उत्तम शिक्षक समाजाला दिलेत. सुसंस्कार देण्याचे कार्य महाविद्यालय अभिमानाने पूर्ण करत होते. पण आजच्या प्रगत विज्ञान युगात उत्तम शिक्षक देणारी प्रयोगशाळा तयार करण्यासाठी काय केले पाहिजे हा विचार महाविद्यालयाच्या प्रत्येक घटकाला वाटत होता. म्हणजेच महाविद्यालयाला तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज असी इमारत असली पाहिजे असे प्रत्येकाच्या मनात होते. त्याप्रमाणे काय प्रयत्न करता येतील असा विचार महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीत चर्चेला आला आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बी.एम. पाटील सरांनी प्रयत्न करायला, साहेबांना विनंती करायी असे ठरले. उत्तम कार्य करायचे असेल तर योग्ती निश्चित येते आणि त्याप्रमाणे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव या शाखेला भेट देण्यासाठी २०१९ मध्ये योग आला. प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब शाखा भेट देण्यासाठी तासगाव शहरात आले होते आणि त्यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी एम पाटील सर यांनी साहेबांना एक विनंती केली. साहेबांनी इमारत खूपच छान झाली आहे आणि ती बांधली पाहिजे हे म्हणत असताना मी दोघानाही

पान नं. २ वर

सांस्कृतिक कार्यक्रमांमधून विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्व विकास

–प्रा. डॉ. एम. एस. उभाळे (सांस्कृतिक विभाग प्रमुख)



मानवाच्या जीवनात कलेला अनन्यसाधारण महत्व आहे. मानवाच्या जीवनातून कला वजा केली तर मानवाचे जीवन निरस होऊन जाईल. एका संस्कृत श्लोकात असे म्हटले आहे की, बुद्धिमान माणसाचा वेळ काव्य-विज्ञान-कल्पनूक यांच्या आनंदप्रवाहात जातो तर मूर्खाचा वेळ हा दारूच्या गोष्टीची संगत, झोप, नाहीतर भांडणात जातो. म्हणजेच आपल्या जीवनात कलेला महत्वाचे स्थान आहे.

आमच्या महाविद्यालयात सांस्कृतिक विभागामार्फत अनेक प्रकारे सांस्कृतिक कार्यक्रम वर्षभर साजरे केले जातात. दिनविशेष, थोर व्यक्तींच्या पुण्यतिथी, जयंती, राष्ट्रीय सण तसेच एनडीसी सादर केले जाणारे कार्यक्रम,कार्यशाळा, चर्चासत्रे यांचे आयोजन वर्षभर केले जाते. त्यातून आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्व विकास व्हावा हाच उदात्त हेतू असतो.

अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून कामाची विभागणी केली जाते. सर्वच कामे सर्व विद्यार्थ्यांनींना करता यावीत. अशा प्रकारचे नियोजन केले जाते.

त्यात सुंदर फलक लेखन करणे, सूत्रसंचालन करणे, संगणकावर कार्यक्रम पत्रिका तयार करणे, स्टेजव्यवस्था करणे, प्रतिमापूजनासाठी लागणाऱ्या सर्व बाबींचे नियोजन करणे, एखादी विद्यार्थिनीकडे कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेचे कार्य सोपवले जाते. काही विद्यार्थिनींकडे आलेल्या पाहुण्यांची ओळख करून देण्याची जबाबदारी दिली जाते. तर काही विद्यार्थिनी पाहुण्यांच्या स्वागतासाठी लागणाऱ्या सर्व बाबींचे नियोजन करीत असतात. तर काही विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या वेळेप्रमाणे त्यानी कसून आपली विचारांची अभिव्यक्ती करत असतात. तर काही विद्यार्थिनी कार्यक्रमाच्या दोन-तीन दिवस अगोदर पाहुणच कार्यक्रमाच्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित चित्रीफिका तयार करीत असतात. तर काही विद्यार्थिनी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत महाविद्यालयाचे दरवर्षी प्रकाशित होणारा माहेर वार्षिक अंक व दर सहा महिन्यांनी प्रकाशित होणारा स्नेहकुंज वार्तापत्र देऊन करीत असतात. यानी विद्यार्थिनी स्वागत गीत सादर करतात. तर काही विद्यार्थिनी स्वागत गीताला संगीत साथ देतात. त्यामुळे महाविद्यालयात येणारे वक्ते हे महाविद्यालयातील सुंदर आठवणींची साठवणूक व आनंद घेऊन जात असतात. ते पुन्हा या महाविद्यालयात येण्यासाठी ! तसेच काही विद्यार्थिनींनी आभार अभिव्यक्ति करीत असतात. काही विद्यार्थिनी कार्यक्रमांचे सुंदर फोटो काढतात. तर काही विद्यार्थिनी या लाईव्ह कार्यक्रमाचे छोटे छोटे व्हिडिओ तयार करीत असतात. तर काही विद्यार्थ्यांनी या वर्तमानपत्रासाठी बातमी तयार करीत असतात. तर काही विद्यार्थिनी नॅक मूल्यांकनासाठी लागणारे फाईल्स सॉफ्ट कॉपी मध्ये संगणकावर तयार करीत असतात. म्हणजेच एखादा कार्यक्रम सादर करण्यासाठी वर्गातील सर्वच विद्यार्थिनी उत्साहाने भारावलेल्या असतात. या सर्वच कार्यक्रमांमधून

पान नं. २ वर

स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार

–प्रा. डॉ. एल. व्ही. भंडारे

स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार हे अनमोल आहेत. परक्या भाषेतील दुसऱ्याचे विचार ते ठोकंयात कसे तरी कोठून आणि त्याच्या बळावर विद्यापीठाच्या चार दोन पदव्या मिळवणे म्हणजे शिक्षण असे आपण म्हणतो, पण आपल्याला अशा शिक्षणाची गरज नाही, तर आपल्याला अशा शिक्षणाची गरज आहे की, जे चारित्र्य बळ उत्पन्न करू शकेल. अशा शिक्षणाची गरज आहे की ज्याने शील बनते, मानसिक शक्ती वाढते, बुद्धी तीक्ष्ण विशाल होते आणि ज्याद्वारे मनुष्य आपल्याच पायांवरती उभा राहू शकतो. आपल्याला अशा शिक्षणाची गरज आहे की, ज्याद्वारे उद्योगधंद्याची वाढ होईल व माणूस नोकरीच्या मागे न लागता आपली उपजीविका करू शकेल आणि आलेल्या आपत्तींना तोंड देण्यास समर्थ होईल.

१) एकाग्रता : स्वामी विवेकानंदाच्या मते,'मानुस निर्माण करणारे शिक्षण हवे'. आज आपल्या देशाला लोखंडी स्नायूची व पोलादी मनाची गरज आहे. कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेताना एकाग्रतेची गरज असते. मनाची एकाग्रता जेवढी अधिक, ज्ञान संपादनही तेवढेच अधिक. एकाग्र मनाने कोणतेही काम केले तर चांगले होते व त्यामुळे आपल्याला यश मिळते. एकाग्रता हा एकच मंत्र आहे की ज्याच्यायोगे निसर्गाची कवाडे उघडून प्रकाशाचे झोतच झोत दिसू लागतील. कोणत्याही कार्यक्षेत्रातील यश हे एकाग्रतेवर अवलंबून असते.

२) विचार : आपले व्यक्तिमत्व घडण्यामध्ये आपले विचार कारणीभूत ठरतात. आपले विचार आपल्याला घडवीत असतात. आपल्या शरीररूपी लोहखंडावर प्रत्येक विचाररूपी हातोडीचा घाव आपल्याला हवा आपण आपल्या विचारांप्रमाणे आकार त्याला देत असतो. शब्द हे गौण असतात. विचार नित्य असून ते फार दूरवर पसरतात. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या विचारांची कसोशीने काळजी घ्यायला हवी. स्वामी विवेकानंद म्हणतात की, 'आपण आपले भाग्य निर्माते आहोत. आपण देवमाध्या किंवाद्यामाणे आहोत. आपणच आपल्यातूनच तत्व काढून आपले कपाळ विचारी आणि कालांतराने त्यात गुरुकडून जाते. कर्मचे हे जाळे आपणच आपल्याभोवती विणले आणि अज्ञानाने आपण बध्द आहोत असे वाटून आपण मदतीसाठी रडून आकांत मांडीत असतो परंतु ही मदत कोठून बाहेरून येत नसते ती येत असते आपल्या आत्म्यातून. प्रत्येक माणूस हा चुका करतो व त्यातून आपल्या चुका सुधारत असतो म्हणजेच तो चुकत चुकत शिकत असतो'

स्वामीजी म्हणतात की, 'चुकायचे रडगाणे गात बसू नका. यातून चुका घडल्या म्हणून रडत बसण्यात काहीही अर्थ नाही. यातून काहीही साध्य होणार नाही. यासाठी त्यांनी एक उदाहरण

पान नं. २ वर

Fourth newsletter published on 22nd October 2023

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव.

स्नेहकुंज वार्तापत्र

| संपादक : डॉ. बी. एम. पाटील | कार्यकारी संपादक : डॉ. एम. एस. उभाळे | अंक – ५ वा | वर्ष – ३ रे | १८ एप्रिल २०२४



संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे व डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्याचे अनावरण.

संस्थामाता व बापूजी साळुंखे कार्य : एक प्रेरणा

- डॉ. एल. व्ही. भंडारे

भारत महान्ये नररत्नांची खाण, तपस्व्यांची तपोभूमी कर्मयोग्यांची कर्मभूमी फक्त अपरी बौद्धिक मानसी तपस्वी, कर्मयोगी अथवा नररत्ने होतात सर्व कार्यक्षेत्रात शिक्षण क्षेत्र हे अग्रगण्य आहे. शिक्षणाच्या भक्कम आणि मजबूत पायावरच मानवाच्या यशाचे भव्य मंदिर उभे राहते. आधुनिक काळात शिक्षणाच्या ज्ञानयज्ञात महाराष्ट्रातील अनेक शिक्षणप्रेमी व समाज सुधारक सुरुवातीपासून आपले सर्वस्व अर्पण केले आहे. त्यातीलच एक नररत्न म्हणजे श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाराष्ट्रातील पाटण तालुक्यातील सणपूर गावी एका प्रतिष्ठित घराण्यात ९ जून १९१९ रोजी बापूजींचा जन्म झाला. त्यांचे संपूर्ण नाव गोविंद ज्ञानोजीराव साळुंखे असे होते. बापूजींचे बालपण अत्यंत परिस्थितीत गेले. सणपूरसारख्या छोट्या खेड्यात, परिस्थितीच्या पोटात सापडलेल्या गोविंदाने बापूजींपर्यंत होताना ज्ञेय म्हणजे एक सुंदर आलेख आहे. आई लहानपणी वारलेली, वडिलांचे घरही हरवलेले आणि परिस्थितीच्या दशावतारात सापडलेले हे छोटे मूल एवढा भीषणसंघर्ष कसे सहन हे पाहिले म्हणजे आपले मन आश्चर्याने थक्क होते. संस्कृत व मराठी हे बापूजींचे आवडते विषय होते. त्यांनी संस्कृतची शासनाकडून शिष्यवृत्ती पटकावली होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण इस्लामपूरला झाले. कोल्हापूर येथील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये राहून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. ते सन १९४५ मध्ये बी.ए. व सन १९४६ मध्ये बी.टी. झाले. पूज्य बापूजींचे जीवन शिक्षण व संस्कार यातूनच त्यांचे सामाजिक, राष्ट्रीय व शैक्षणिक कार्य साकारले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन सातारा येथील महाराजा सयाजीराव महाविद्यालयातून शिक्षक म्हणून नेमले. बापूजी हाडाचे शिक्षक होते. खऱ्या अर्थाने देशाचा आधारस्तंभ असणारी जनसामान्यांचा मार्गदर्शक असणारी सावी जाणीव बापूजींना होती. अशासाठी दाही दिशा आम्हा फिरविसी जगदीशा ही साधी सामान्य मागणीची जीवनपद्धती कायमसाठी दाही दिशा आम्हा फिरवीसी जगदीशा ही महानायकांची गीत. तथापि तडजोड तर अशा व्यक्ति कोणत्याही परिस्थितीत स्वीकारत नाहीत. म्हणूनच सयाजीराव शिक्षणसंस्था १९५५ रोजी सोडली. १९४५ ते १९५५ असे कष्टाने घडविलेले शिक्षण समाजसेवेचे जीवनाचे सोनेरी पान कर्मवीर अण्णांच्या समाजाच्या चरणावर समर्पित केले.

सातारच्या कोटेश्वराला छोटी छोटी प्रगाम नगर कामीन निवासिनी महालक्ष्मीच्या आशीर्वादानुसारी बापूजी निघाले.

तो काळ असा होता की लोक अशिक्षित होते. अंधश्रद्धा, हलकीपणा अशा अनेक समस्यांनी ग्रासलेले होते. नवी सुविधा त्यांच्यापर्यंत पोहचत नव्हत्या. त्यांना जर शिक्षित बनवायचे असेल तर शिक्षण हा एक मार्ग उत्तम पर्याय समाज अंधश्रद्धेपासून दूर करण्यासाठी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. कृष्णा कोयनेच्या पावन संगमावर काठ येथील शनेश्वर मुरलीधरनगर मंदिरात अण्णांच्या सोबत नवीन शिक्षणसंस्था स्थापण्याचा निर्णय घेतला बापूजी धार्मिक वृत्तीचे तसेच साधारणी, सहनशीली.

शिक्षणाला एक व्रत म्हणून बापूजींनी मानले. शिक्षणात संस्कारांना असलेले महत्त्व त्यांनी ओळखले. केवळ ज्ञान आणि विज्ञान यांनीच समाज सुख, समृद्धी व अंतिम ध्यानदायक जाणार नाही तर त्याला सुसंस्कारांची जोड आवश्यक आहे. हे त्यांनी आधीच व आयुष्यभर मानिले म्हणूनच त्यांनी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार हे संस्थेचे ध्येयवाक्य निवडले. हे बीज वाक्य म्हणजे बापूजींच्या आदर्श व्यक्तिमत्वाचे आणि सुसंस्कृत मनाचे प्रतीक आहे. सुसंस्कार म्हणजे मानवी जीवन. त्यामुळे हा आत्मा सुसंस्कारी होण्यासाठी शिक्षणप्रसाराची आवश्यकता असते. यासाठी गोष्टींची प्राप्तासाठी म्हणजेच सुसंस्कार, बापूजींनी तयार केलेल्या या ध्येय वाक्याचाच त्यांची दूरदृष्टी आणि एकविसाव्या शतकाच्या आधीच्या काळात आव्हानांचा सामना करावा लागत नाही. बापूजींचे शैक्षणिक विचार या संस्थेच्या शेष चिन्हांमध्येच आहेत. संस्थेच्या बोधचिन्हामध्ये पाणी, कमळ, ज्योत, प्रकाश व ॐ आहे. पाणी म्हणजेच जीवन, त्यांचे तरुण म्हणजेच बुद्धमत्तेला आहे. कमळ भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे. कमळ हे निर्मळ जीवन या अर्थी वापरले आहे. कमळातील पाकळ्यावर शिक्षण हा शब्द आहे. पणती, ज्योत व प्रकाश ही ज्ञानाची प्रतीके आहेत. ज्योतीने ज्योतीत पेटवावी व विश्वास प्रसार करावा ही अपेक्षा व्यक्त केली आहे. पाकळ्यावर दीन पणत्या आहेत पण त्यांच्या ज्योतीवर ज्ञान, शिक्षण म्हणजे शिक्षण. ज्योतीच्या प्रभेतून ईश्वर पाचव अक्षरांची निर्मिती आहे. सुसंस्काराची प्रभा आहे. तेथे ईश्वर दर्शन होणारच ! बापूजींचे

पान नं. २ वर

संपादकीय

डॉ. एम. एस. उभाळे

एका कवीच्या ओळी वाचनात आल्या.

वास समजावू, देवा
तुझा माणूस वाटला
तुकयाच्या सावलीत
एक अभंग फाटला.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी अतुलनीय माणसांना जोडण्याचे व उभे करण्याचे कार्य केले. बहुजनांच्या शिक्षणासाठी त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचण्याचे महान कार्य केले. ग्रामीण भागात शिक्षण प्रसिद्धी पोहोचण्यासाठी संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव या शाखेची निर्मिती केली. शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या निर्मितीपासून विविध शैक्षणिक सुविधा पुरवण्यासाठी संस्थेचे मा. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, गुणवंत कार्यकर्ते, प्रशासकीय सेवक यांचे सहकार्य मिळत आहे. महाविद्यालयात आधुनिक सुविधा विकसित होत आहेत. तसेच महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक सहभागीय उपक्रम, अभ्यासपूरक उपक्रम, तसेच अभ्यासेतर उपक्रम राबवले जात आहेत. हे सर्व उपक्रम समाजापर्यंत पोहोचण्यासाठी एक माध्यम हवे होते. त्यासाठी आम्ही गेल्या ३ वर्षांपासून प्रत्येक सहा महिन्यानी स्नेहकुंज वार्तापत्र प्रकाशन करीत आहोत. त्यातून विद्यार्थीनी, प्राध्यापक व समाजातील विचारवंत यांना स्वतःच्या विचार अभिव्यक्तीसाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. संस्थेचा हा ५ वा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हा सर्वांना अतिशय आनंद होत आहे.

आमच्या महाविद्यालयाचे तिसऱ्या फेरीचे नॅक मूल्यांकन होणार आहे. त्यासाठी सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय सेवक तसेच सर्व विद्यार्थिनी प्रयत्न करीत आहेत.

महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट म्हणजे प्राचार्यपदी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांची निवड समितीद्वारे नियुक्ती झालेली आहे. नॅक मूल्यांकन तसेच सर्व प्रशासकीय कामांसाठी महाविद्यालयात अनियमित प्राचार्य असणे ही महाविद्यालयाची गरज होती. ती पूर्णपणे आली. याचा आम्हाला सर्व गुणदोष कार्यक्षेत्रांना समाधान वाटत आहे.

तासगाव नगरपरिषदेद्वारे तासगाव नगरपरिषदेमार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत स्वच्छ व सुंदर शाळा व महाविद्यालय स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या स्पर्धेमध्ये आमच्या संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयास प्रथम क्रमांकाचे प्रशस्तिपत्रक प्राप्त झालेले आहे. महाविद्यालयात नगर परिषदेने वर्गीकरणाचे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले. त्यामुळे हे प्रशस्तिपत्रक महाविद्यालयास प्राप्त झालेले आहे. महाविद्यालय स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थिनी या स्पर्धेस सहकार्य लाभले.

महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक यांचे मार्फत शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम व एम.ए.(शिक्षण शास्त्र) अभ्यासक्रम चालवले जातात.

पान नं. ३ वर

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आदर्शमाता पुरस्कार वितरण सोहळा

तासगाव- येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दि.१८/४/२०२४, गुरुवार रोजी संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आदर्शमाता पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याची हा दुसरा संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आदर्शमाता पुरस्कार आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. राजनंदा शिंदे यांच्या मातोश्री श्रीमती कमलादेवी अरुण तसे रामकुमार शिंदे यांना देण्याचे महाविद्यालय पुरस्कार निवड समितीने ठरविले आहे.

तसेच याच कार्यक्रमात संस्थापिका व लोकप्रतिनिधींच्या उभारलेल्या विस्तारित इमारतीचे उद्घाटन व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे व डॉ. बापूजी साळुंखे पुतळा अनावरण कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी व आदर्शमाता पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था कोल्हापूर येथील मान्यवर उपस्थितीत होणार आहे. मा. कौस्तुभ मुरलीधर गावडे (मुख्य कार्यकारी अधिकारी), मा. प्राचार्य, डॉ. सिद्धिद्र हुजरे (सातारा जिल्हा विभाग प्रमुख) यांच्या हस्ते होणार आहे. तरी या कार्यक्रमास तासगावातील सर्व शिक्षणप्रेमी जनांनी उपस्थित रहावे. असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एम. पाटील यांनी व सर्व प्राध्यापक वृंदांकडून कळविण्यात आले आहे.

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगावची विस्तारीत इमारत.

Fifth newsletter published on 18th April 2024

CO-ORDINATOR
Internal Quality Assurance Cell.
S. S. S. Mahila Shikshanshastra
Mahavidyalay. Tasgaon
Dist. Sangli. - 416 312

Principal,
Sansthamata Sushiladevi Salunkhe
Mahila Shikshanshastra Mahavidyalaya
Tasgaon Dist Sangli Pin 416 312